# "दैनिक लोकमत व दैनिक भास्कर मधील महिला अत्याचारांच्या बातम्यांचा चिकित्सक अभ्यास"

काळे साधना रामचंद्र संशोधक विदयार्थिनी एम.फिल ३रा सेमिस्टर डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठ औरंगाबाद.

.........................................................................................................

**प्रस्तावना :**

भारत हा विविध धर्मात, पंथात विखुरलेला असल्यामुळे इथे प्रत्येकाच्या चालीरितीआणि परंपरा वेगवेगळया आहेत.त्यामुळे महिलांच्या प्रश्नांचे स्वरूप देखिल बदलत चालले आहे.मानव म्हणुन स्त्री आणि पुरूष यांच्यात भिन्नतेपेक्षा साम्य जास्त आहे. ही वस्तुस्थिती समाज आजही मान्य करायला तयार नाही.

डॉ.बी.एम. कर्‍हाडे यांनी आपल्या "भारतीय समाज, प्रश्न आणि समस्या" या ग्रंथात म्हटले आहे की, सूरूवातीच्या काळात स्त्री पुरूष विषमतेचा विचारच नव्हता, कारण त्यांच्यामध्ये कोणतेही बंधन नव्हते. त्यामुळे स्त्री स्वातंत्र्य कोणापासुन हा प्रश्नही नव्हता.मानसिक व बौध्दिक दृष्टीने स्त्री कमजोर आहे असे मानले जात नव्हते. सर्वच क्षेत्रामध्ये स्त्रीयांचा मुक्त संचार होत होता. परंतु कालांतराने यात बदल होत गेले.स्त्रीयांचे अधिकार हळुहळू कमी करून तिला चूल आणि मूल या व्याख्येपर्यंत मर्यादित ठेवले. बहूपत्नीत्वाची प्रथा, सतीप्रथा, केशवपन, देवदाशी इत्यादी प्रथा रूढ करून स्त्रीयांना वयात येण्यापूर्वी बालविवाह या प्रतिष्ठेच्या सापळयात अडकवण्यात आले. स्त्रीयांचा छळ आपल्यादेखिल आजुबाजुला होत असतो. अत्याचार हा शारिरिक असतोच असे नाही, मानसिक अत्याचाराच्या खुना या शारिरिक अत्याचाराप्रमाणे दिसत नसल्या तरी त्याचे घाव हे जास्त खोल आणि त्रासदायक असतात. आपल्यावर अन्याय होत असूनही सामाजिक प्रतिष्ठा जपण्यासाठी महिला अत्याचार सहन करत असतात.सरोज कांबळे व प्रतिमा परदेशी यांच्या मते, पुरूष सत्ता म्हणजे कुटूंबव्यवस्थेत, समाजात आणि उत्पादन व्यवस्थेत पुरूषांना सत्तेचे आणि शोषणाचे स्थान देणारी व्यवस्था होय.

**महिला अत्याचाराची व्याख्या :**

१. दास यांच्या मते : "अत्याचार म्हणजे अशी क्रिया की ज्यामध्ये स्त्रीला जखमी करण्याची पुरूषांची उच्च प्रतिची क्षमता असते".

२. कॅम्पेयांच्या मते : "अत्याचार म्हणजे एका व्यक्तीने दुर्सया व्यक्तीवर शारिरिक हल्ला करून तिला जखमी करणे होय".

भारतीय दंड संहीता ३५४ नुसार, जेव्हा एखदया पुरूषाकडुन एखादया स्त्रीचा जाणीवपूर्वक विनयभंग होईल अशा प्रकारची कृती केली असेल तर त्याला विनयभंग असे म्हणतात.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये दैनिक लोकमत व दैनिक भास्कर या दैनिकाचा अभ्यास केलेला आहे. या विषयाचा अभ्यास करताना काही उद्दिष्टे ठेवण्यात आलेली आहे ती पुढीलप्रमाणे

१. स्त्री अत्याचाराची कारणे जाणून घेणे.
२. स्त्रीयांची सदयःस्थिती काय आहे हे पाहणे.
३. स्त्रीयांवर होर्णाया अत्याचाराचा परिणाम अभ्यासणे.

**संशोधन पध्दती:**

प्रस्तूत शोधनिबंधासाठी चिकित्सक अभ्यास करण्यात आलेला आहे. दैनिक लोकमत व दैनिक भास्कर या वृत्तपत्रांचा अभ्यास करताना वर्णनात्मक आराखडा माहितीच्या स्वरूपात तयार करण्यात आला आहे. या आराखडयात कार्यकारणभाव

शोधून काढावा लागतो त्यानंतर संबंधित विषयाचं विश्लेषण करण्यात येते. दैनिक लोकमत व दैनिक भास्कर या वृत्तपत्रातील महिलाविषयक अत्याचाराच्या बातम्यांचा एक चिकित्सक अभ्यास या विषयावर शोधनिबंध करण्यासाठी वर्णनात्मक पध्दतीचा वापर योग्य ठरेल.

**गृहितकृत्ये ः**

"दैनिक लोकमत आणि दैनिक भास्कर महिला अत्याचाराच्या बातम्यांचा एक चिकित्सक अभ्यास" या विषयाचा अभ्यास करताना संशोधकाने खालील गृहितकृत्ये काढली आहेत.

१. आजही स्त्रीयांना माध्यमांमध्ये दुय्यम स्थान दिले जाते.
२. महिलांना संपत्तीत वाटा दिला जात नाही.
३. स्त्रीयांच्या अत्याचारामध्ये घट होताना दिसत नाही.
४. स्वतःचा हक्क मिळवण्यासाठी स्त्रीयांना संघर्ष करावा लगतो.

**महिला अत्याचाराचा इतिहास, प्रकार आणि सदयस्थितीः**

आदिम काळापासुन स्त्रीचा प्रवास पाहिला तर ती पुरूषाप्रमाणे त्यांच्या बरोबरीने जगण्यासाठी आणि पुढच्या पिढीच्या संरक्षणासाठी लढली असण्याची शक्यता आहे. आजही स्त्रीयांचा समाजामध्ये वरचष्मा आहे.

पुरातन काळातही गार्गी, मैत्रेयी, लोपमुद्रा या स्त्रीयांचा रचनेच्या वेदात समावेश आहे. त्या काळातल्या गोष्टी ऐकल्या तर स्त्रीयांनादेखिल पुरूषांच्या बरोबरीने मान होता. अनेक राजकन्या आपले स्वयंवर स्वतः मांडत असत. राजकन्या ज्याला पसंत करील त्याच्याशीच तिचे लग्न होत असे. युध्दकलेतही त्यावेळच्या स्त्रीया पारंगत होत्या.

**वैदिक कालखंडः**

ज्या काळात वेदांची निर्मिती झाली त्या कालखंडाला वैदिक कालखंड मानले जाते. या कालखंडातील समाज हा पुरूषप्रधान होता. पण स्त्रीयांना पुरूषांच्या बरोबरीने स्वतंत्र उपभोगता येत होते. स्वतःचा विकास करण्यासाठी शिक्षण, विवाह, संपत्ती, वारसा इ. भाबत त्यांना उच्च अधिकार होते. स्त्रीयांना उपनयन्यचा अधिकार होता. ग्रहस्थाकडुन विविध विदया कलासुध्दा शिकता येत होत्या.

**उत्तर वैदिक कालखंडः**

वैदिक कालखंडानंतर उत्तर वैदिक कालखंडामध्ये स्त्रीयांची पीछेहाट होण्यास सुरवात झाली. हा ब्राम्हण ग्रंथाचा काळ होता. या काळात सुरवातीला स्त्रीला प्रतिष्ठेचे स्थान दिलेले आढळते. स्त्री ही घरची लक्ष्मी असते, तीचा आदर सन्मान केला पाहीजे असे उत्तर वैदिक कालखंडात म्हटले आहे.

**स्मृती कालखंडः**

स्मृती कालखंडामध्ये स्त्रीयांवर अन्याय अत्याचार केला गेला. मनुस्मृतीचा फार मोठा प्रभाव तत्कालीन समाज व्यवस्थेवर होता आणि आजही आहे. मनुस्मृती स्वयंभु व मनुच्या सुचनेवरून त्याचा शिष्य भृगू ऋषीने निवेदन केले असून त्यामध्ये १२ अध्याय व २६९४ श्लोक आहेत.

मनुच्या अनुसार स्त्रीया झोपाळु असतात. त्या सतत बसुन राहतात. त्यांना दागिने आवडतात. कामभावना, क्रोधभावना, उध्दटपणा, द्रोह, दुःखाची कृती, दुराचार हे स्त्रीयांचे दुर्गुण असतात. शृंगार करून पुरूषांना दुषीत करणे हे स्त्रीयांचे काम आहे. त्यामुळे त्याच्यापासुन सावध राहीले पाहीजे असे मत मनु मांडतो.

**उत्तर स्मृती कालखंडः**

उत्तर स्मृतीच्या कालखंडामध्ये स्त्रीयांचा दर्जा फारच खालावत गेलेला दिसतो. याच काळात स्त्रीयांचे लग्न ८ ते १0 वर्षाच्या कालावधीत होताना दिसतात. येथुनच बालविवाहाची सुरवात झाली असे म्हणता येईल. या काळात स्त्रीयांना शिक्षणापासुन जवळ जवळ वंचित ठेवण्यात आले असे म्हणता येईल. स्त्रीया या

खोटया असतात. विचार न करता निर्णय घेणे, कपटी, मुर्ख, अशुध्द, निर्दयता हे स्त्रीयांचे स्वभाव दोष आहेत.

**मध्ययुगीन कालखंडः**

हा कालखंड मुस्लीम राजवटीचा समजला जातो. आठव्या शतकात मोहम्मद बिन कासिम याने भारतातील सिंध प्रांतावर आक्रमण केले.येथुन पुढे ४00 वर्ष असे आक्रमण होत राहीले. मुस्लीमाप्रमाणे गोषा म्हणजे पडदा पध्दत हिंदु स्त्रीयांवर लादण्यात आली. पती निधनानंतर सती जाण्याचे प्रमाण वाढले. सती गेल्यामुळेच पतिला नरकात जाण्यापासुन स्त्रीया वाचवु शकतात असा युक्तीवाद केला गेला.

**संशोधनाचा कालावधी** : १ फेब्रुवारी २0१७ ते २८ फेब्रुवारी २0१७

**महिला अत्याचाराचे वार्तांकन आणि आशय विश्लेषण :**

**दैनिक लोकमत मधील महिला अत्याचाराच्या बातम्याचे विश्लेषण :**

एका दिवसाचे मुद्रित क्षेत्र = १६६४४ से.मी.

एका दिवसाचे पृष्टाचे क्षेत्रफळ = ३६९५२ से.मी.

एका महिन्याच्या अंकाचे मुद्रित क्षेत्र = ८६,६६५६ चौ.से.मी.

| **गुन्हे** | **महिनाभरात वर्तमानपत्रांनी स्त्री अत्याचाराच्या बातम्यांना दिलेली जागा.** |
|---|---|
| विनयभंग | १४१८.४५ चौ.सेमी |
| बलात्कार | १४४८.२५ चौ.सेमी |
| खुन | १९३९.२५ चौ.सेमी |
| आत्महत्या | १३0७.४५ चौ.सेमी |
| हुंडाबळी | १0३0.0५ चौ.सेमी |
| शारिरिक शोषण | ६८0.0६ चौ.सेमी |
| छळ | ४६१.२५ चौ.सेमी |
| जीवे मारण्याचा प्रयत्न | ६६१.२५ चौ.सेमी |
| एकूण टक्केवारी | ५.३७ ट |

**दैनिक भास्कर मधील महिला अत्याचाराच्या बातम्याचे विश्लेषण :**

एका दिवसाचे मुद्रित क्षेत्र = १९९५ सेमी.

एका दिवसाचे पृष्टाचे क्षेत्र = ३५९१0 सेमी.

एका महिन्याचे अंकाचे मुद्रित क्षेत्र = १00५४८0 चौ.सेमी

| **गुन्हे** | **महिनाभरात वर्तमानपत्रांनी स्त्री अत्याचाराच्या बातम्यांना दिलेली जागा.** |
|---|---|
| विनयभंग | ३४0.४५ चौ.सेमी |
| बलात्कार | ४७.२५ चौ.सेमी |
| खुन | १८७.२२ चौ.सेमी |
| आत्महत्या | १२४८.२५ चौ.सेमी |
| हुंडाबळी | १३३५.00 चौ.सेमी |
| शारिरिक शोषण | २२0८.२८ चौ.सेमी |
| छळ | ५९१.0५ चौ.सेमी |
| जीवे मारण्याचा प्रयत्न | ४४१.0६ चौ.सेमी |
| एकूण टक्केवारी | ४.0५ |

**विश्लेषण :**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये दैनिक लोकमत व दैनिक भास्कर मधील महिला अत्याचाराच्या बातम्यांचा चिकित्सक अभ्यास केला असता, दोन्हीही वर्तमानपत्रांनी

महिलांच्या बातम्यांना स्थान दिले. दैनिक भास्कर पेक्षा दैनिक लोकमत या वर्तमानपत्रानी महिलांवर होणारे अत्याचारांच्या बातम्यांना अधिक स्थान दिले आहे.

**निष्कर्ष आणि सुचना :**

महिलांच्या कायदयामुळे आणि त्यांना दिल्या गेलेल्या अधिकारामुळे त्यांच्या स्थितिमध्ये काहीही बदल होताना दिसत नाही. महिलांवर होणारे अत्याचार थांबवण्यासाठी कायदे आहेत. परंतु कायदे असुन सुध्दा महिला अत्याचारांची स्थिती वाढताना दिसते.

१. दैनिक लोकमत या वृत्तपत्राने महिला अत्याचारांच्या बातम्यांना महिना भरांमध्ये ५.३७ टक्के जागा दिली.
२. दैनिक भास्कर या वृत्तपत्रात महिला अत्याचाराच्या बातम्यांना एका महिन्यामध्ये ४.०५ टक्के इतके स्थान दिले आहे.
३. इतर बातम्यांच्या तुलनेत दोन्ही वृत्तपत्रामध्ये महिला अत्याचाराच्या बातम्यांना कमी स्थान देण्यात आले आहे.
४. लोकमत या वृत्तपत्रामध्ये महिलांच्या खूनाच्या बातम्यांचे प्रमाण जास्त आहे.
५. दैनिक भास्कर या वृत्तपत्राने महिलांच्या शारिरिक शोषणाच्या बातम्यांना महिनाभरात जास्त प्राधान्य दिले आहे.

**सुचनाः**

१. माध्यमांनी लैंगिक शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार करावा.
२. स्त्रीयांवरील अत्याचार थांबविण्यासाठी माध्यमांनी एक चळवळ उभी करावी.
३. माध्यमांनी स्त्रीयांना कायदयाविषयी महिती दयावी.
४. महिलांच्या बातम्यांना अधिकाधिक ठळकपणे प्रसिध्दी दयावी.

**समारोपः**

विविध आंतरराष्ट्रीय मोहिमेनंतरही विकसित आणि विकसनशिल देशात स्त्रीयांविरूध्दच्या हिंसाचाराची व्याप्ती खुप मोठी आहे. अनेक देशात तर लहानशा कारणामुळे केलेल्या मारहाणीला फारशा गंभीरतेने पाहीले जात नाही. त्यामूळे स्त्रीयांकडे लक्ष न देणे, जोडीदारास न सांगता बाहेर जाणे,स्त्रीयांशी वाद घालणे इ.प्रकार घडतात.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये दैनिक लोकमत व दैनिक भास्कर या दोन वर्तमानपत्रांचा अभ्यास करताना महिला अत्याचाराच्या बातम्यांचा चिकित्सक अभ्यास करून महिलांवर होणारे अत्याचार हे कशा प्रकारचे असतात, हे या दोन वर्तमानपत्रातुन समजले. शिवाय त्यांना कोणकोणत्या अडचणींना सामोरे जावे लागते. घरातुन होणारे विरोध अशा गोष्टी निदर्शनास आल्या.

**संदर्भ साहित्यः**


१. मेधा ताडपत्रीकरण, 'कौटूंबिक हिंसाचार', डायमंड पब्लीकेशन पुणे, पृ.१.२.
२. कांबळे सं. कुमार, दलित स्त्रीयांच्या मुक्तीचा प्रश्न, डायमंड पब्लीकेशन पुणे, पृ.२.
३. डॉ.बी. एम. र्कहाडे, भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, पिंपळकुटे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स नागपुर, पृ. २३४,२३५.
4. Containing Criminal procedure code 1973, IPC 1860 evidence act 1972, Aurangabad Published by Ashok Grover Company, Aurangabad, P.No.388
५. पू.ल. भांडारकर, सामाजिक संशोधन पध्दती महाराष्ट्र विदयापीठ ग्रंथनिर्मिती भांडार नागपुर, पृ.क्र.०४.
६. डॉ. प्रदिप आगलावे, सामाजिक संशोधन पध्दती शाळा व तंत्रे, विदयाप्रकाशन नागपुर, प्रथम आवृत्ती २०००, पृष्ट क्र.१७.

७. डॉ. पाटील वा. भा. संशोधन पध्दती, प्रशांत प्रकाशन पुणे, पृष्ट क्र. १६.
८. डॉ. निलीमा लटके, संशोधन करताना, डायमंड पब्लिीकेशन पुणे, प्रथम आवृत्ती २००८, पृ. क्र. २४.
९. गोटे गव्हाणे शुभांगी, डॉ. मंगला पाटील याचा स्त्रीकाळ आज आणि उदया हा लेख साउथ एशियन सोशल रिसर्च पब्लीकेशन औरंगाबाद, २००३ पृ. १३२.
१०. आत्रेय भिखनलाल, भारतीय नितिशास्त्र का इतिहास हिंदी समिती सुचना विभाग उत्तरप्रदेश लखनऊ, १९६४ पृ. ३५.
११. साळुंके आ. हा. हिंदुसंस्कृती व ती, मंजिरी प्रकाशन, माहिम मुंबई १९८९, पृ. १५७.
१२. १ फेब्रुवारी २०१८ ते २८ फेब्रुवारी २०१८ चे दैनिक लोकमतचे अंक.
१३. १ फेब्रुवारी २०१८ ते २८ फेब्रुवारी २०१८ चे दैनिक भास्करचे अंक.